**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

- **श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सर्वत्र उत्साह, मध्यरात्री बारा वाजता होणाऱ्या कृष्ण जन्माची जैय्यत तयारी.**
- **आदिवासी पाड्यांचं आदर्श गावांमध्ये रुपांतर करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचं राज्यपाल सी.राधाकृष्णन यांचं आवाहन.पी.**
- **सन २००४ नंतर केंद्रीय सेवेत रुजू झालेले कर्मचारी एकीकृत पेन्शन योजनेसाठी पात्र; मध्य रेल्वेतील सुमारे 73 टक्के कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ.**
- **२७ व्या राष्ट्रीय ईगव्हर्नन्स परिषदेचं यजमान पद- महाराष्ट्राकडे, ३ सप्टेंबरला मुख्यमंत्री करणार उदघाट्न.**
- **आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी राज्य सरकारतर्फे विशेष कक्षाची स्थापना.**

****

**श्रीकृष्ण जन्माष्टमी**

श्रीकृष्ण जन्माष्टमी आज सर्वत्र साजरी होत आहे. भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी, मथुरा-वृंदावनसह देशभरातल्या मंदिरांमध्ये तयारी पूर्ण झाली असून, मंदीरांसह घरोघरी देखील मध्यरात्री बारा वाजता श्रीकृष्ण जन्म सोहळा साजरा केला जाईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी देशवासियांना, कृष्णाष्टमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी जन्माष्टमी निमित्त, जुहूच्या राधा रासबिहारी इस्कॉन मंदिरात आज भगवान श्रीकृष्णाचं दर्शन घेतलं आणि आरती केली. नागपूर शहरात इस्कॉन मंदिरासह,विविध छोट्या-मोठ्या मंदिरांमध्ये वैविध्य पूर्ण कार्यक्रम आयोजिण्यात आले आहे. जयप्रकाश नगर स्थित गुरुमंदिर इथं उद्या दही हांडी, नृत्य नाटिका आणि गायन वादनाचा कार्यक्रम बाळगोपाळांसाठी आयोजिण्यात आला आहे. जन्माष्टमीच्या निमित्तानं विश्व हिंदू परिषदेच्या वतीनं, धंतोली इथल्या गोरक्षण श्रीकृष्ण मंदिरातून शोभायात्रा काढण्यात

आली. यात विविध संस्थांतर्फे चित्ररथांचा समावेश होता. ठिकठिकाणी शोभायात्रेचं स्वागत करण्यात आलं. या शोभायात्रेत हजारो भाविक सहभागी झाले होते.

**राज्यसभा**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील यांची आज राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. यावेळी त्यांनी विधान भवनात, निवडणूक अधिकाऱ्यांकडून पत्र स्वीकारलं.

**राज्यपाल**

आदिवासी बांधवांच्या शेवटच्या घटकापर्यंत, शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी, विशेष प्रयत्न करावेत तसंच त्यांना पायाभूत सुविधा आणि उत्तम सेवा देवून, आदिवासी पाड्यांचे, आदर्श गावांमध्ये रुपांतर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत असं आवाहन, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केलं. आदिवासी जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर आदर्श आदिवासी गाव बनविणे आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणे या विषयाबाबत राज्यपाल, सी.पी.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली आज राजभवन इथं बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला आदिवासी विकास मंत्री, डॉ.विजयकुमार गावित यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 'आदर्श आदिवासी गावात रस्ते, शुद्ध पिण्याचे पाणी, पायाभूत आणि वैद्यकीय सुविधा, दर्जेदार शिक्षण, शाश्वत कृषी विकास, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावं. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उत्तम शाळा सुरू करून दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे असंही, राज्यपाल यावेळी म्हणाले.

**एकीकृत पेन्शन योजना**

सुनिश्चित निवृत्तीवेतन, कौटुंबिक निवृत्तीवेतन, किमान निवृत्तीवेतन, यांत महागाई भत्यांचा समावेश आणि ग्रॅच्युइटी व्यतिरिक्त सेवानिवृत्तीवर, एकरकमी देयक अशी पाच वैशिष्ट्य असलेली, एकीकृत पेन्शन योजना अर्थात युपीएसचा लाभ २००४ नंतर केंद्रीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना मिळणार आहे अशी माहिती, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागाचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक बी.श्रीधर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी सहाय्यक विभागीय रेल्वे व्यवस्थापक, जी.जगताप, वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी, उदयकुमार भारती प्रामुख्यानं उपस्थित होते.

यूपीएसच्या माध्यमातून सेवानिवृत्ती झाल्यानंतर मिळणा-या एकरकमी देयकाबाबत अधिक माहिती सांगताना, बी.श्रीधर म्हणाले-

***लमसम एक बहुत बड़ा बेनिफिट है इसमें ग्रेज्युटी एक ऐसा NTT है पेंशन का लमसम सेटलमेंट ड्यू का हाफ महीना ऑफ़ एवरी १२ मंथ एक साल में आधे महीने की सैलरी को ग्रेज्युटी कहते है। OPS में ओ ग्रेज्युटी का फार्मूला यूपीएस ने भी उसको मॉडिफाइड नहीं किया। फार्मूला वही रहेगा, लेकिन ग्रेज्युटी के साथ-साथ वन टेंथ ऑफ़ मन्थली सैलरी ऑफ़ एवरी सिक्स मंथ, एक साल में छे माह छे दिन का सैलरी का जो आएगा ओ ज्यादा मिलेगा, तो इसमें यूपीएस में ओ बेनिफिट है।***

दरम्यान, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक रामकरण यादव यांनी आज पुणे, नागपूर,भुसावळ,सोलापूर मंडळातील, विभागीय रेल्वे व्यवस्थापकांच्या कार्यालयामध्ये उपस्थित, प्रसार माध्यमांशी दूरदृश्य प्रणाली द्वारे युपीएस संदर्भात संवाद साधला. मध्य रेल्वेतील सुमारे ७३ टक्के कर्मचारी हे, न्यू पेंशन स्कीम मध्ये आहेत, या सर्वांना युनिफाईड पेन्शन स्कीमचा लाभ घेता येईल, अशी माहिती यावेळी मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी, डॉ.स्वप्निल निला यांनी दिली.

**वसंतराव चव्हाण निधन**

नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांचं आज, दीर्घ आजारानं निधन झालं, ते ७० वर्षांचे होते. त्यांच्यावर मागील अनेक दिवसांपासून, हैदराबाद इथल्या किम्स रुग्णालयात उपचार सुरु होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत वसंतराव चव्हाण यांनी भाजपच्या प्रतापराव पाटील-चिखलीकर यांचा मोठा पराभव केला होता. नायगाव या गावात एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून, त्यांनी मोठा शैक्षणिक विस्तार केला. वसंतराव चव्हाण यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी अकरा वाजता नायगाव इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती, त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी चव्हाण यांच्या निधानाबद्दल, शोक व्यक्त केला आहे. तसंच काँग्रेस नेते राहुल गांधी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या आहेत.

**ई-गव्हर्नन्स परिषद**

केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या पुढाकारानं, "२७ वी राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषद-२०२४", तीन आणि चार सप्टेंबर रोजी, जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर, वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई इथं आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेचं यजमानपद यंदा महाराष्ट्राकडे असून, "विकसित भारतः सुरक्षित आणि शाश्वत ई-सेवा पुरविणे" हा या परिषदेचा विषय आहे. या परिषदेस पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री, डॉ.जितेंद्र सिंह अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार असून, उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेतून सु-प्रशासन तसंच ई-गव्हर्नन्ससाठीच्या उत्कृष्ट संकल्पनांचं, आदान-प्रदान होईल. या परिषदेत सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय सुधारणा, रचना आणि कार्यपद्धती या उप-विभागाच्या नवीन नावांची घोषणादेखील केली जाणार आहे. पुरस्कार विजेते, व्याख्याते आणि इतर सहभागींसाठी, nceg.gov.in या पोर्टलवर नोंदणी सुरू झाली आहे.

**आंतरजातीय लग्न**

राज्य शासनाच्या गृह विभागाच्या परिपत्रकानुसार, आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणा-या जोडप्यांना सुरक्षा पुरविण्यासाठी, विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या विशेष कक्षास अशा विवाहाबद्दल प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या तक्रारींची योग्यरीत्या दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे. तसंच, दाखल प्रकरणे आणि संवेदनशील क्षेत्र याबाबत त्रैमासिक आढावा घेण्याकरीता जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष कार्यरत असणार आहे. वर्धा जिल्हयात यासाठी सामाजिक न्याय भवन इथं, सुरक्षागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. जोडप्यांना सदर सुरक्षागृह सुरवातीला एका महिन्यासाठी नाममात्र शुल्कावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यानंतर गांभीर्य लक्षात घेता, जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल असं, जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी यांनी कळविलं आहे.

**खड्डे बुजविण्यासाठी अँड्रॉइड ॲप**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणारे राज्यमार्ग आणि प्रमुख मार्गांवरील खड्ड्याच्या तक्रारी नोंदवण्यासाठी अँड्रॉइड ॲप विकसित करण्यात आलं आहे. या

ॲपच्या माध्यमातून नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या आधारे, मार्गांवरील खड्डे बुजवले जाणार आहेत. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडण्याचं प्रमाण वाढते. खड्डे बुजवण्याच्या मागणीसाठी नागरिकांना आपल्या तक्रारी घेऊन संबंधित खात्याच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. दरम्यान, राज्यमार्ग आणि प्रमुख मार्गांवरील खड्ड्यांची माहिती देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अँड्रॉइड ॲप तयार करण्यात आलं असून, या ॲपवर नागरिकांना रस्त्यांवरील खड्ड्यांसंदर्भात घरबसल्या आपल्या तक्रारी नोंदवता येणार आहेत. ॲपवरून मिळालेल्या माहितीच्या आधारे, आमच्या विभागाकडून तक्रारींचं निराकरण करण्यात येईल आणि खड्डे मुक्ती योजना राबवण्यात येईल अशी माहिती, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अमरावती जिल्ह्यातील उपविभागीय अभियंता, जगन दांदडे यांनी दिली.

**ट्रायसिकलचे वितरण**

दिव्यांगांना सर्वसामान्यां प्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार आहे. दिव्यांगांना त्यांचा अधिकार प्रदान करण्याचा आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नरत राहू असं प्रतिपादन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. गडकरी यांच्या हस्ते नागपूर शहरातील, ३० अस्थिव्यंग दिव्यांगांना सौर ऊर्जाचलित, मोटराईज्ड ट्रायसिकलचं वितरण करण्यात आलं. गडकरी म्हणाले की, 'अनेक दिव्यांगांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. रोजगाराचा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा असून, ट्रायसिकल दिल्यामुळ त्यांना छोटा-मोठा व्यवसाय करून उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविणे शक्य होणार आहे.' लवकरच एक हजार दिव्यांगांना ई-रिक्शासाठी मदत करण्यात येणार असून, त्यासाठी १८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती गडकरी यांनी यावेळी दिली.

**आकाशवाणी संगीत चाचणी**

विविध संगीत प्रकारा अंतर्गत हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, लोकसंगीत आणि सुगम संगीताच्या कलाकारांसाठी, आकाशवाणी स्वरपरीक्षण-२०२४ साठीची प्रक्रिया सुरु झाली आहे. ज्या संगीत कलाकारांना स्वर परीक्षणासाठी अर्ज करायचा असेल, त्यानी mas.prasar-bharati.org या वेबसाईटवर जाऊन आपला अर्ज ऑनलाईन पध्दतीनं भरावा. अर्ज करण्यासाठी अंतिम तारीख २१ सप्टेंबर २०२४ ही आहे.

**हवामान**

नागपूरसह संपूर्ण विदर्भात आजपासून पुढील दोन दिवस, वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या हवामान केंद्रानं दिला आहे. या दरम्यान आकाश बहुतांश अभ्रच्छादित राहणार असून, अधून-मधून मेघगर्जनेसह पावसाच्या सरी पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

*****